ePaper

येत्या 10 ते 12 दिवसांत मंत्रीमंडळ विस्ताराची शक्यता



| वर्ष - 7 । अंक - 63 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- राष्ट्रवादी मुंबईअध्यक्षपदी कोण?
- वनडे वर्ल्ड कपचा बिगुल वाजला
- मणिपूर हिंसाचार: राज ठाकरे यांची भूमिका

www.mahaenews.com । रविवार, दि. 2 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महापालिकेच्या इतिहासात दमदार कामगिरी; पहिल्या तिमाहीतच

# कर वसूलीचा उच्चांक!

## » अवघ्या 90 दिवसांत 447 कोटी महापालिका तिजोरीत जमा

### » आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मानले करदात्यांचे आभार




।पिंपरी चिंचवड । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने पालिकेच्या आत्तापर्यंतच्या इतिहासात प्रथमच दमदार अशी कामगिरी केली आहे. विभागाने अवघ्या 90 दिवसांत 50 टक्क्यांपेक्षा जास्त करदात्यांकडून तब्बल 447 कोटी रुपयांचा कर वसूल करून महापालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नाव कोरले आहे. तर प्रामाणिकपणे कर भरुन शहरविकासात योगदान देणाऱ्या नागरिकांचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आभार मानले आहेत.**

शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 2 हजार 203 नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाव्दारे जनजागृती, महत्त्वाच्या चौकात होर्डिंग्ज, रिल्स स्पर्धा, सोशल मीडियाचा प्रभावी वापर याचबरोबर प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा CUSTOMISED SMS पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे 2023-24 च्या अवघ्या पहिल्या तिमाहीतच 447 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात विभागाला यश आले आहे. 6 लाख 2 हजार 203 मालमत्ता धारकांपैकी 3 लाख 3 हजार 350 मालमत्ता धारकांनी म्हणजे पन्नास टक्के मालमत्ता धारकांनी तीन महिन्यांत कराचा भरणा केला आहे. या मालमत्ता धारकांनी 447 कोटी 3 लाख 96 हजार रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे.

### वृध्दीकडे नेणारा प्रकल्प सिद्धी'

**»पालिकेने यंदा मालमत्ता करांची बिले वाटप महिला बचत गटांतील महिलांना देण्याचे ठरवले. याला प्रकल्प सिद्धी असे नाव देण्यात आले. हा निर्णय पालिकेसाठी खरोखर 'सिद्धिकडून वृध्दिकडे' नेणारा ठरला. जवळपास चारशे महिलांनी निव्वळ चाळीस दिवसात उन्हातान्हाची पर्वा न करता शंभर टक्के बिलाचे वाटप केले. यंदा नागरिकांना वेळेत बिले मिळाल्यामुळे नागरिकांनी 30 जून पर्यंत असलेल्या सवलतींचा फायदा घेतला आहे. त्यामुळे महिला बचत गट नावीन्यपूर्ण स्वरूपाचे काम पण करू शकतो असा संदेश गेला. या महिलांसाठी हा एक नवा अनुभव असला तरी त्यांनी यात यशस्वी सहभाग नोंदवला आहे**

### 30 जून 2023 ठरला 'विक्रमी दिवस'

**»नेहमी वर्षाअखेर 31 मार्च रोजी सर्वाधिक कराचा भरणा होत असतो. यंदा मात्र 30 जूनला सर्वच कर संकलन विभागीय कार्यालयात मालमत्ता धारकांची तुफान गर्दी होती. 30 जूनला एकाच दिवसात तब्बल 14 हजार 620 नागरिकांनी तब्बल 30 कोटी 85 लाख रुपयांचा भरणा केला. त्यात 21 कोटी निव्वळ ऑनलाईन भरणा आहे.**

> कर संकलन विभागाच्या या ऐतिहासिक कामगिरीचे सर्व श्रेय जबाबदार, प्रामाणिक आणि जागरूक करदात्या नागरिकांना आहे. त्याबद्दल या सर्व नागरिकांचे मी मनापासून आभार मानतो. हा सर्व कररुपी पैसा शहराच्या शाश्वत विकासाचा पाया राहील याची मी ग्वाही देतो. या शहराच्या पायाभूत सुविधा जागतिक दर्जाच्या होतील यावर मी वैयक्तिक लक्ष देत आहे.
>
> **– शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> गत वर्षीपासून आम्ही राबवत असलेल्या अनेक नावीन्यपूर्ण कल्पना आणि उपक्रमाचे हे सांघिक यश आहे. हे करत असताना आम्हाला काही जप्तीसारख्या अप्रिय कारवाया कराव्या लागल्या असल्या तरी त्यामागे शहराच्या विकासाचे सूत्र आहे हे लक्षात घेतले पाहिजे. यातून हे शहर अधिक सर्वांगसुंदर, राहण्यासाठी सुखद होईल याची दक्षता घेतली जाईल.
>
> **– प्रदीप जांभळे-पाटील,** अतिरिक्त आयुक्त

> माहितीचे शुध्दीकरण, बीलांचे वेळेवर वाटप यासाठी आमचा प्रकल्प सिद्धी एक मैलाचा दगड ठरला आहे. "सिद्धीकडून वृद्धिकडे" ही टॅगलाईन बचत गटांच्या महिलांनी अक्षरशः खरी करून दाखवली. या प्रकल्पाला आम्ही भविष्यात अजून उंचीवर नेणार आहोत.
>
> **– नीलेश देशमुख,** सहायक आयुक्त,पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# पुणे तिथे काय उणे!

## » नवा विक्रम प्रस्थापित होण्याची शक्यता

### दुसऱ्या तिमाहीत घरांच्या विक्रीत विक्रमी वाढ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील घरांच्या वाढत्या मागणीला बांधकाम व्यावसायिकांकडून नव्या सदनिकांच्या रूपातून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले आहे. पुण्यात २०२३ च्या दुसऱ्या तिमाहीत (एप्रिल ते जून) २० हजारांहून अधिक घरांची विक्री झाल्याचे ॲनारॉक रिसर्च या संस्थेच्या सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत दुसऱ्या तिमाहीत झालेल्या घरांच्या विक्रीत यंदा ६५ टक्क्यांची वाढ झाली असल्याने २०२३ हे वर्ष बांधकाम क्षेत्रासाठी एक नवा विक्रम प्रस्थापित करण्याची शक्यता आहे.**

ॲनारॉक रिसर्च या संस्थेने नुकतेच देशातील बांधकाम क्षेत्राच्या कामगिरीचे सर्वेक्षण केले असून, यात पुण्यासह देशातील सात शहरांमधील दुसऱ्या तिमाहीत घरांच्या विक्रीची तुलना करण्यात आली आहे. त्यात २०२३मध्ये पुण्यातील सदनिकांच्या विक्रीचा दर देशात सर्वाधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. २०२२मध्ये दुसऱ्या तिमाहीत पुण्यात १२ हजार ५०० घरांची विक्री झाली होती. यंदा हीच आकडेवारी २० हजार ६८०पर्यंत पोहोचली आहे. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत दुसऱ्या तिमाहीत विक्री झालेल्या घरांच्या संख्येत जवळपास आठ हजारांची वाढ झाली आहे. ही आकडेवारी पुण्यातील बांधकाम क्षेत्राचा उत्साह द्विगुणित करणारी असून, यामुळे तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीतही घरांची विक्रमी विक्री होईल, असा अंदाज बांधकाम व्यावसायिकांनी बांधला आहे. एकीकडे घरांच्या विक्रीत वाढ होत असताना पुणे शहरात नव्या घरांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होताना दिसत आहे.



> २०२२प्रमाणेच याही वर्षी सदनिकांच्या विक्रीचा दर चांगला राहील, असा अंदाज बांधकाम व्यावसायिकांनी व्यक्त केला होता. तो अंदाज खरा ठरताना दिसत आहे. पुण्यातील ग्राहक घरे खरेदी करण्यावर भर देत आहेत. ही अशीच स्थिती कायम राहिली, तर २०२३ या वर्षात गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक घरांची विक्री होऊ शकते. लोकांच्या मागणीप्रमाणे घरे मिळत असल्याने ही वाढ दिसते आहे.
>
> **- कपिल गांधी,** कार्यकारी संचालक, सिग्मा वन युनिव्हर्स

'ॲनारॉक'च्या सर्वेक्षणानुसार २०२२मध्ये दुसऱ्या तिमाहीत पुण्यात नव्या गृहप्रकल्पांत उपलब्ध घरांची संख्या १६ हजार ५६० इतकी होती.

२०२३मध्ये ती २१ हजार ३५० इतकी आहे. गेल्या तीन महिन्यांत नव्या गृहप्रकल्पातील घरांमध्ये जवळपास अडीच हजार घरांची भर पडली आहे. पुढील सहा महिन्यांत नव्या उपलब्ध घरांमध्ये आणखी पाच हजार सदनिकांची भर पडेल, असेही चित्र निर्माण झाले आहे.

## सदाशिव पेठेत तरुणीचा जीव वाचविणाऱ्या तरुणांना मुख्यमंत्र्यांकडून १५ लाखांचे बक्षीस



। पुणे । महाईन्यूज ।

सदाशिव पेठेत महाविद्यालयीन तरुणीवर कोयत्याने वार करणाऱ्या हल्लेखोराला रोखून तरुणीचे प्राण वाचविणारे लेशपाल जवळगे, हर्षद पाटील, दिनेश मडावी यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येकी पाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले. जखमी तरुणीला मुख्यमंत्री शिंदे यांनी पाच लाख रुपयांची मदत दिली आहेत.

सारसबाग परिसरातील शिवसेना भवन कार्यालयात शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांच्या हस्ते तरुणीचे प्राण वाचविणारे महाविद्यालयीन तरुण लेशपाल जवळगी, हर्षद पाटील, दिनेश मडावी यांना प्रत्येकी पाच लाख रुपयांचे बक्षीस दिले. आर्थिक मदतीचा तरुणांना शिक्षणासाठी उपयोग होईल. त्यांना पाठबळ मिळेल, असा संदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी पाठविला आहे. आरोपीने केलेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणीला पाच लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. जखमी झालेल्या तरुणीच्या मित्राला शिवसेना शिंदे गटाकडून पंचवीस हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. शस्त्रक्रियेचा खर्चही करण्यात येणार आहे. शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्त रितेश कुमार यांची भेट घेतली. एकतर्फी प्रेमातून तरुणींवर होणारे हल्ले रोखण्यासाठी त्वरीत उपाययोजना करण्यात याव्यात. महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, असे डॉ. वाघमारे यांनी सांगितले.

# राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान

## » सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 122 व्या पदवीप्रदान समारंभ उत्साहात

। पुणे । महाईन्यूज ।

**स्नातकांना मिळालेली पदवी त्यांचे ज्ञानाप्रति समर्पण आणि वचनबद्धतेचे प्रतिक आहे. त्यांनी प्राप्त केलेले ज्ञान आणि कौशल्य त्यांना आपल्या उद्दीष्टापर्यंत पोहोचविण्यात उपयुक्त ठरेल. स्नातकांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग देश आणि समाजाच्या उत्थानासाठी करावा, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२२ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ.राजेश गोखले, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते.**




राज्यपाल श्री.बैस म्हणाले, पदवी प्राप्त करणे हे अंतिम उद्दीष्ट नसून शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. परीक्षेचे बदलते स्वरुप आणि नवे तंत्रज्ञानाचे युग लक्षात घेऊन त्यादृष्टीने आपली तयारी करावी लागेल. पुणे माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोबाईल उद्योगाचे केंद्र आहे. याचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी कसा करता येईल यासाठी विद्यापीठाने सातत्याने प्रकल्प राबविले पाहिजेत. २१ व्या शतकाच्या गरजा लक्षात घेऊन चांगल्या विचारांच्या आधारे परिपूर्ण व्यक्तीमत्व घडविणे हा शिक्षणाचा गाभा आहे. प्रत्येकाने एक किंवा त्यापेक्षा जास्त विषयात सखोल अभ्यास करण्यासाठी सक्षम असावे. चारित्र्य, नैतिकता, घटनात्मक मूल्ये, बौद्धीक जिज्ञासा, वैज्ञानिकता, रचनात्मकता आणि सेवाभावनेच्या आधारे विज्ञान, समाजशास्त्र, कला, भाषा, तंत्रज्ञान यासह अन्य क्षेत्रातही संधी शोधण्याची क्षमता निर्माण करावी लागेल. उच्च शिक्षणाला उत्पादकतेकडे न्यावे लागेल. विद्यार्थ्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करावी लागेल. विद्यापीठ ही अपेक्षा पूर्ण करेल असा विश्वासही राज्यपाल श्री. बैस यांनी व्यक्त केला.

रोबोटीक्स, नॅनो कॉम्प्युटरसारख्या विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यासोबत अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धीमत्तेचा उपयोग करावा लागेल. अभ्यासक्रमात वेगाने परिवर्तन करीत विद्यार्थांची क्षमता बांधणी करणे गरजचे आहे. आपल्या अभ्यासक्रमाला बदलते औद्योगिक तंत्रज्ञान, रोबोटिक्स, नॅनो कॉम्प्युटर यांच्याशी सुसंगत राहावे लागेल. आधुनिक आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता प्राप्त करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला जात आहे. समकालीन गरजांनुसार अभ्यासक्रमात गतिमान बदल करून विद्यापीठाने आपले विद्यार्थी तयार केले पाहिजेत.भारत जगातील सर्वात तरुण देश असून जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे. विद्यापीठांकडे युवकांची मोठी संख्या आहे जे भविष्यात देशाचे नेतृत्व करणार हेत. म्हणून विद्यापीठाची जबाबदारी अधिक असून हे आव्हान विद्यापीठ पेलत आहे ही चांगली बाब आहे. उच्च शिक्षणात सामाजिक स्तरावर एक बौद्धीक आणि कुशल राष्ट्र निर्माण करण्याची क्षमता आहे. गुणवत्तापर्ण उच्च शिक्षण म्हणजे केवळ रोजगार निर्माण करण्यापूरते नाही तर समद्ध राष्ट्र बनविण्याचे केंद्र असावे. नव्या शिक्षण धोरणाच्या आधारे भारताला महाशक्ती करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे, असेही राज्यपाल म्हणाले.

# काळेवाडीतील रस्त्यांची चाळण!

## एखादा जीव गेल्यावर महापालिका जागी होणार का?

### युवा नेते ॲड. मंगेश नढे यांचा महापालिकेला तीव्र जनआंदोलनाचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागील अनेक वर्षांपासून महापालिका हद्दीतील सर्वात दुर्लक्षित गाव असलेल्या काळेवाडीत पहिल्याच पावसात रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून एखादा निष्पाप जीव गेल्यानंतरच या कुंभकर्णी महापालिका प्रशासनाचे डोळे उघडणार का? असा संतप्त सवाल मानद पशुकल्याण अधिकारी तथा युवा नेते ॲड. मंगेश नढे यांनी उपस्थित केला आहे.**



जवळपास पाऊण लाख लोकसंख्या असलेल्या काळेवाडी प्रभागातील विविध भागांतील रस्त्याची चाळण झाली असून, आपण रस्त्यावरून प्रवास करतोय की खड्डयातून हाच प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडलेला दिसत आहे. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर प्रभागात विकासकामांच्या नावाखाली खोदण्यात आलेले रस्ते व्यवस्थित न बुजविल्याने तसेच त्या खोदलेल्या रस्त्यांवर डांबरीकरण करण्यात न आल्याने साई इन्कलू, पवार हाईट्स येथील रस्त्यावर ठिकठिकाणी भले मोठे खड्डे पडलेले आहेत. तर अनेक भागात विशेषतः नढेनगर येथील राजवाडे लॉन्स, राधाकृष्ण मंदिर, ओंकार कॉलनी या परिसरात वर्षानुवर्षे रस्तेच करण्यात न आल्याने त्याठिकाणी पाणी साचून त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या ठिकानाहून ये-जा करायची कशी? असा प्रश्न पादचारी, वाहनचालक, विद्यार्थी आणि लहान मुलांना पडलेला आहे.

रात्रीच्या वेळी बहुतांश परिसरातील रस्त्यांवरील पथदिवे बंद असतात. अशावेळी या खड्डयांमध्ये एखादा वाहनचालक किंवा पादचारी, लहान मुले पडून एखादा जीवघेणा अपघात झाला तट त्याला जबाबदार कोण? त्यामुळे लवकरात लवकर काळेवाडीतील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले नाही तर जनआंदोलन उभारण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी महापालिका प्रशासनाची असेल असा इशारा ॲड. मंगेश नढे यांनी दिला आहे.

## आकुर्डीतील शाळेच्या कामामुळे हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था; रुग्णांचे हाल



१) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपिठकडे जाणारा 18 मीटर रुंद डीपी रस्ता व इतर डीपी रस्ते विकसित करणे. २) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील साने चौक ते चिखली चौक रस्ता मंजूर विकास आराखड्यानुसार विकसित करणे. ३) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील देहू आळंदी ते सोनवणे वस्ती कडे जाणारा ३० मीटर रुंद डीपी रस्ता विकसित करणे. ४) स्पाइन सिटी चिखली ते पुणे नाशिक रोड, ५) प्रभाग क्रमांक 12 मधील त्रिवेणी नगर चौक ते तळवडे चौकापर्यंत 24 मीटर रस्ता विकसित करणे. ६) प्रभाग क्रमांक 12 मधील कॅनबे चौक ते भक्ती शक्ती चौकापर्यंत देहूरोड कॅन्टोन्मेंट हद्दीतून जाणारा नोन डीपी रस्ता विकसित करणे. ७) प्रभाग क्रमांक 12 मधील नदीच्या कडेने जाणारा मंजूर विकास योजनेतील रस्ता विकसित करणे १२ मीटर रुंद, ८) प्रभाग क्रमांक 12 मधील  कॅनबे चौक ते स्पाइन रस्त्याला जोडणारा 18 मीटर रुंद डीपी रस्ता विकसित करणे.

# समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात पिंपरी-चिंचवडमधील मायलेकीसह सासूचा मृत्यू

## दुःखद घटनेमुळे पिंपळे सौदागर परिसरात शोककळा पसरली

।पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात होरपळून २५ जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये पिंपरी-चिंचवडमधील मायलेकीसह सासूचा समावेश आहे. वनकर कुटुंब हे शहरातील पिंपळे सौदागर भागात राहते. संगणक अभियंते असलेले प्रणित वनकर यांच्या आई, दोन वर्षीय मुलगी आणि पत्नी काही दिवसांपूर्वी लग्न समारंभासाठी नागपूरला गेल्या होत्या. ते नागपूरहून ट्रॅव्हल्सने परतत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला आहे. या दुःखद घटनेमुळे पिंपळे सौदागर परिसरात शोककळा पसरली आहे.**







नागपूरवरून निघालेल्या ट्रॅव्हलचा समृद्धी महामार्गावर मध्यरात्री भीषण अपघात झाला. यात होरपळून २५ जणांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात एवढा भीषण होता की मृतांची ओळख पटवने देखील कठीण झालेला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेची नोंद घेऊन मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत जाहीर करत मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनी घटनास्थळी जाऊन घटनेची माहिती घेत नातेवाईकांचे सांत्वन केले.

समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातातील ट्रॅव्हल्समध्ये पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपळे सौदागर येथे राहात असलेलं वनकर कुटुंबातील दोन महिला आणि एका चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. प्रणित वनकर हे संगणक अभियंते असून त्यांची आई, दोन वर्षीय मुलगी आणि पत्नी या नागपूर येथे लग्न समारंभासाठी गेल्या होत्या.

प्रणित वनकर देखील गेले होते. परंतु, ते गेल्या आठवड्यातच पुण्यात परत आले आणि आई, मुलगी आणि पत्नी ट्रॅव्हल्सने सोबत येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरावरती शोक काळा पसरली आहे.

# असंघटित महिला कामगार कंपनी सुविधांपासून वंचित

। पिंपरी । महाईन्यूज ।

महिला कामगार आणि त्यातही असंघटित महिला कामगार यांना किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, घरापासून कंपनीपर्यंत येण्यास बस आदी सुविधा मिळत नाहीत.

पिंपरी चिंचवड, तसेच; पुणे शहरात हडपसर, पुणे ग्रामीणला चाकण, तळेगाव, मावळ, रांजणगाव, शिक्रापूर, कुरकुंभ, जेजुरी, खेड-शिवापूर, भोर आदी औद्योगिक भागात (एमआयडीसी) महिला कामगारांची कुचंबणा होत असल्याचे दिसून येत आहे. त्यासाठी त्यांना किमान वेतन देण्याबरोबरच सामाजिक सुरक्षा, उपयुक्त प्रशिक्षण देऊन स्वयंसिद्ध बनवण्यासाठी स्वतंत्र महिला कामगार कल्याण केंद्र सरकारने स्थापन करावे, अशा मागण्या येत आहेत.

### सर्वच क्षेत्रांत प्रमाण वाढतेय...

संघटित क्षेत्रात बँकिंग, एलआयसी व सरकारे कार्यालये या बरोबरच औद्योगिक क्षेत्रात महिला मॅनेजर, इंजिनिअर व मानव संसाधन विभागात व्यवस्थापक, लॉजिस्टीकमध्ये छोट्या ट्रेलरवर ड्रायव्हर, पॅकेजिंग व्यवस्थापन अशा पदांवर काम करण्याचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. कंपन्यांचे महिलांना प्रोत्साहन देणे व महिला सोशिक असतात, कामचुकार नसतात, अशी दोन्ही कारणे महिलांना कामावर घेण्याबाबत आहेत.

### लैंगिक छळासाठी अंतर्गत तक्रारी समिती

लैंगिक छळ व शोषणाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी १० कामगारांपेक्षा जास्त कामगार असतील तेथे कायद्यानुसार ‘अंतर्गत तक्रार समिती’ नेमणे बंधनकारक आहे. या समितीवर कंपनीतील वरिष्ठ पदावरील महिला अध्यक्ष असते. सदस्य संख्येवर बंधन नाही. कंपनीतील कामगारांवर सदस्य संख्या करावी लागते. यामध्ये निम्मे पुरुष व निम्म्या महिला असतात.




**जगात गेली अनेक वर्षे 'पोस्ट ट्रुथ' या संकल्पनेची चर्चा चालू आहे. त्याला मराठीत सत्योत्तर, उत्तर-सत्य किंवा सत्य पश्चात असे म्हणतात. असत्याला सत्याचा पेहराव करून जगात मिरविणे, हा त्याचा थोडक्यात अर्थ आहे. माणूस असे कदाचित इतिहासपूर्व काळापासून करीत आला असेल. अमेरिकेच्या अध्यक्षपदी खोटारड्या डोनाल्ड ट्रम्प यांची निवड झाल्यानंतर 'सत्य पश्चात' या संकल्पेनची पुन्हा जोरदार चर्चा सुरू झाली. म्हणजे ते निमित्त झाले. निमित्ताचा निकष लावला तर भारतात रोज हीच चर्चा व्हायला हवी. इतके आपले सामाजिक जीवन असत्यमय आहे.**

# सत्याच्या काळ्याकभिन्न सावल्या

या वैचारिक चर्चेची नव्याने संधी दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खरे तर आभारच मानायला हवेत. सत्याचा पेहराव चढविलेल्या असत्याच्या अंगणात गुगली, खंजिर, कात्रजचा घाट ही सगळी भावंडे गुण्यागोविंदाने खेळत असतात. राजकारण हे स्वच्छ मनाने, निकोप स्पर्धेतून आणि विकासाच्या चर्चेतून करायवाचे देशकार्य नसून परस्परांना फसवून, एकमेकांची माणसे फोडून आणि आयत्यावेळी विश्वासघात करून करावयाचे जणू अधो-विश्वातले शौर्यकर्म आहे; असा संस्कार महाराष्ट्रावर गेली अनेक दशके सातत्याने होतो आहे. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी सकाळी राजभवनात जाऊन शपथ घेणे, ही राजकीय घोडचूक होती. मात्र, या 'घोड्यांना' तिथवर नेऊन सत्तेचे पाणी औट घटकेसाठी प्यायला लावणारे शरद पवार हे याच साऱ्या नाट्याचे सूत्रधार होते, हे आता स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात शरद पवार यांनी या प्रकारचा खेळ सन १९७८ पासून सुरू केला आहे. महत्त्वाचे राष्ट्रीय नेते होऊनही त्यांना अजून



असले खेळ खेळण्यात स्वारस्य वाटावे, ही धक्कादायक आणि आश्चर्यकारक गोष्ट आहे.

शरद पवार यांच्या 'लोक माझे सांगाती.. राजकीय आत्मकथा' या पुस्तकाची सुधारित आवृत्ती अलीकडेच आली आहे. यात महाविकास आघाडीची जन्मकथा सांगताना (पान क्रमांक ३१४ वर) पवार लिहितात, 'सरकार स्थापनेचा मार्ग प्रशस्त होत असतानाच एक अभूतपूर्व वळण आले. २३ नोव्हेंबरच्या सकाळी साडेसहाला फोन खणखणला. 'राष्ट्रवादीचे काही आमदार राजभवनात पोचलेले असून, अजित पवार यांनी भाजपला राष्ट्रवादीचा पाठिंबा असल्याचं पत्र सादर केलं आहे. देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर अजितदादा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत,' अशी माहिती मला देण्यात आली. तो मोठा धक्का होता. महाविकास आघाडीचं सरकार बनवण्यासाठी राष्ट्रवादीचा पुढाकार असतानाच हे घडणं, म्हणजे आमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह होतं...' पवार यांनी पुण्यात जी पत्रकार परिषद घेतली; तीत तर भाजपसोबत सरकार स्थापनेची चर्चा म्हणजे 'गुगली' होता, असा दावा केला आहे. मग त्यांना त्या सकाळी फोनवर धक्का कसा काय बसला? आता तर ते मी या चर्चेतून चार दिवस आधीच बाहेर पडल्याचे सांगत आहेत. मग त्यांनी तेव्हाच ठाकरे आणि काँग्रेसला सावध का केले नाही? फडणवीस-अजितदादा यांच्या शपथेची पहाटघटिका येईपर्यंत उद्धव ठाकरे यांना 'या नाट्याची' कल्पना देणे पवारांना आवश्यक वाटले नाही. त्यांच्या आत्मकथेवरून तरी तसे वाटत नाही. पवारांचे परवाचे बोलणे आणि त्यांचे आत्मकथेतील कथन, हे ताडून पाहिल्यावर कुणाच्याही मनात सुरेश भटांच्या दोनच ओळी येतील. 'एक साधा प्रश्न माझा लाख येती उत्तरे; हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे?'

खरे तर या पहाटखेळात भाजप, फडणवीस यांच्या विश्वासार्हतेला जसा धक्का बसला; तितकाच मोठा धक्का अजित पवार यांनाही बसला. हेच अपेक्षित असावे. मात्र, पवार आत्मकथेत अजितदादांच्या या वागण्याचे खापर त्रिपक्षीय चर्चेतील काँग्रेसच्या अडेलतट्टूपणावर फोडतात. ही तर कमालच झाली. म्हणजे, या 'गुगली'ने भाजप, ठाकरे, काँग्रेस आणि अजित पवार या सगळ्यांची एकदम विकेट पवारांना घ्यायची होती. १९७८ मध्ये कोण कितव्या इयत्तेत होते, याचा हजेरीपट आता मांडला जात आहे. मात्र, पवार यांनी तेव्हा मुख्यमंत्री असणाऱ्या वसंतदादा पाटील या उमद्या, सरळ मनाच्या नेत्याचा विश्वासघातच केला होता. सन १९९९ मध्ये काँग्रेसमधून बडतर्फी ओढवून घेऊन पुन्हा तोच खेळ करण्यात आला. सन २०१९ मध्ये काय काय झाले, हे सगळे अजून बाहेर आलेले नाही. त्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या नशिबी जी तीन सरकारे आली; त्या तिन्हींचा जन्म उजळ माथ्याने उजेडात होण्याऐवजी कारस्थानी खलबतखान्यांच्या अंधारात झाला आहे. महाराष्ट्रात ही कारस्थानांची संस्कृती नेमकी कशी सुरू झाली, याचा हिशेब इतिहास एक दिवस मांडेलच. तोपर्यंत, ज्या ज्या नेत्यांना सत्याचे उमाळे येतील; त्यांनी त्या त्या वेळी सोयीचे वाटणारे सत्य सांगत राहावे.

## संपादकीय »

### महाराष्ट्रात सर्वांना मोफत उपचार?

***खासगी आरोग्य-सेवा फार महाग झाल्याने या योजना असूनही महाराष्ट्रात रुग्णालयामध्ये दाखल झालेल्यांपैकी सुमारे २०-२५ टक्के रुग्णांना 'संकट-समान' खर्चाला तोंड द्यावे लागते.***

'सर्वासाठी आरोग्य' हे उद्दिष्ट सरकारला गाठायचे असेल तर गरज आहे ती आरोग्यसेवेवरील खर्च वाढवण्याची. तो न वाढवता नुसत्याच मोठमोठ्या योजना जाहीर करणे म्हणजे मृगजळामागे धावण्यासारखे आहे. महाराष्ट्र सरकारने नुकतेच जाहीर केले आहे की आता आयुष्मान भारत आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना एकत्रित राबवल्या जातील. सर्व रेशनकार्ड धारकांना या दोन्ही योजनांची संयुक्त कार्डे देण्यात येतील; तसेच पाच लाख रु.पर्यंत शस्त्रक्रियांसह उपचार मोफत करण्यात येतील. ही बातमी वाचून समज होऊ शकतो की या सर्व लाभधारकांवरील वैद्यकीय खर्चाचा बोजा संपेल. या योजना फक्त रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी म्हणजे एकूण रुग्णांच्या फक्त तीन टक्के रुग्णांसाठी आहेत.

**हीच का बाळासाहेबांची शिवसेना? हीच का तुम्हाला बाळासाहेबांनी दिलेली शिकवण? एकीकडे, जनता तुमच्याच बेपर्वाईमुळे आगीत होरपळून मरतेय आणि तुम्ही प्रवेशाचे जल्लोषात उत्सव करतात? तेही त्याच विदर्भातील मंडळींचे? यापेक्षा अधिक निर्लज्जपणा, कोडगेपणा आणि असंवेदनशीलता काय असू शकते?**

## आम्ही लाज टाकली

आम्ही काळरात्र विसरली
आम्ही तारतम्य गुंडाळली
आम्ही निलाजऱ्या सरकारने,
काय लाज टाकली
लाज टाकली, आम्ही लाज टाकली

भ्रष्ट RTO यंत्रणेची हफ्तेखोरी तसेच अजित पवार यांनी आरोप केल्यानुसार कोट्यवधी रुपये घेऊन पोस्टिंग देणाऱ्या शिंदे-फडणवीस सरकारच्या यंत्रणेमुळे तिकडे समृद्धी महामार्गावर विदर्भातील 26 लोकांची जळून अक्षरशः राख झाली अन् त्याच विदर्भातील वर्ध्यातील मंडळी इकडे प्रवेशाचा उत्सव करण्यात गुंतली, हे दुर्दैव. विदर्भातील या निर्लज्ज मंडळींनी लाज टाकली असेलही कदाचित; पण राज्याचा मुख्यमंत्री? मुख्यमंत्र्यांनी तरी काही भान ठेवायला हवे की नको? राजकारण, प्रवेश तुम्हाला नंतर नाय करता येत? करायचेच असतील तर गुपचूप नाय करता येत? आपल्या राज्यातील 26 लोकांची जळून राखरांगोळी झालीय अन् बातमी विरतही नाही तोवर, काही तासात मुख्यमंत्री आपल्या शासकीय निवासस्थानी प्रवेश सोहळे घेताहेत? काय म्हणावे याला? पुरोगामी महाराष्ट्राने इतका असंवेदनशील मुख्यमंत्री नाय पाहिला आजवर. शिंदेंचे प्रसार माध्यम समन्वयक मीडियाला मेसेज काय पाठवतात - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज वर्षा बंगल्यावर "शिवसेनेत जल्लोषात



प्रवेश" घेत आहेत. थोडी जनाची नाय, तर मनाची तरी शिल्लक आहे की नाय? अरे बाबांनो, ही काय "जल्लोषात प्रवेश" करून घेण्याची वेळ आहे का? हीच का बाळासाहेबांची शिवसेना? हीच का तुम्हाला बाळासाहेबांनी दिलेली शिकवण? एकीकडे, जनता तुमच्याच बेपर्वाईमुळे आगीत होरपळून मरतेय आणि तुम्ही प्रवेशाचे जल्लोषात उत्सव करतात? तेही त्याच विदर्भातील मंडळींचे? यापेक्षा अधिक निर्लज्जपणा, कोडगेपणा आणि असंवेदनशीलता काय असू शकते? सरकारी पैशातून मदत जाहीर करून संपले का तुमचे कर्तव्य? हा जल्लोषात प्रवेश सोहळा आज रद्द करून झाला असता आठवडावडाभराने तर काय एव्हढे आभाळ कोसळणार होते? मुख्यमंत्री साहेब, अहो थोडे तरी भान, तारतम्य ठेवा की. नाही, किमान या पुरोगामी महाराष्ट्रातील यापूर्वीच्या मुख्यमंत्र्यांच्या परंपरेची तरी जाण ठेवा, त्या पदाची तरी शान ठेवा. आम्हाला आज खरोखर तुमच्या कृत्याची लाज वाटतेय. इतक्या मोठ्या दुर्घटनेतील मृतात्म्यांच्या पार्थिवाला अजून अग्नीही दिलेला नसताना तुम्ही साजरा करत असलेल्या जल्लोषात प्रवेश उत्सवाची मी व्यक्तिशः निंदा करतो, निषेध करतो.

**- विक्रांत पाटील**

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादी मुंबईअध्यक्षपदी कोण?

## » माजी नगरसेवक राखी जाधव, नरेंद्र वर्मा यांची नावे चर्चेत

। मुंबई/ठाणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई राष्ट्रवादीचे अध्यक्षपद अनेक दिवस रिक्त असल्याबद्दल विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी कान टोचल्यावर नवीन अध्यक्ष नेमण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. माजी मंत्री नवाब मलिक यांना सक्तवसुली संचालनालयाने अटक केल्यापासून मुंबई राष्ट्रवादीचे अध्यक्षपद रिक्त आहे. तात्पुरती व्यवस्था म्हणून माजी नगरसेवक राखी जाधव आणि नरेंद्र वर्मा यांना कार्याध्यक्ष म्हणून नेमून**



**त्यांना मुंबईतील प्रत्येकी तीन जिल्ह्यांची जबाबदारी दिली.**

नवाब मलिक यांची कारावासातून लवकर सुटका होईल या अपेक्षेने मुंबई राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष पद रिक्त ठेवण्यात आले होते. मात्र मलिक यांची अद्याप सुटका झाली नाही. त्यातच आगामी लोकसभा, विधानसभा आणि मुंबई महानगरपालिका निवडणुकींचा विचार करता मुंबई राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा पूर्णवेळ अध्यक्ष असणे ही राष्ट्रवादीची गरज असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुंबईत पक्षाच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात भाषण करताना मुंबईत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष का वाढला नाही, असा सवाल करीत पक्षाला पूर्णवेळ अध्यक्ष नसल्याची पक्षश्रेष्ठींना जाणीव करून दिली.

अजित पवारांच्या या वक्तव्याने मुंबई राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्ष पदाच्या निवडीची चर्चा सुरू झाली. विद्यमान कार्याध्यक्षा राखी जाधव यांनाच अध्यक्ष नेमावे अशी चर्चा सुरू झाली.

### अजित पवार यांना प्रतिक्षा...

विरोधी पक्षनेतेपदाच्या जबाबदारीतून मुक्त करून पक्षसंघटनेत स्थान मिळावे, अशी इच्छा अजित पवार यांनी व्यक्त केली असली तरी पक्षांतर्गत निवडणुका पार पडेपर्यंत कोणताही निर्णय घेतला जाणार नाही, असे राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केल्याने अजितदादांला लगेचच प्रदेशाध्यक्ष किंवा पक्ष संघटनेत अन्य कोणतेही पद मिळण्याची चिन्हे नाहीत. गेल्या आठवड्यात राष्ट्रवादीच्या वर्धापनदिन समारंभात अजित पवार यांनी पक्षसंघटनेत काम करण्याची इच्छा व्यक्त करून साऱ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला होता. 'पक्ष संघटनेत कोणतीही जबाबदारी द्या. पक्ष कसा चालवतो ते बघा', असा आक्रमक पवित्रा अजित पवार यांनी घेतला होता.

---

# मणिपूरबाबत पंतप्रधानांचे मौन अनाकलनीय! राज ठाकरे यांची टीका

।मुंबई ।महाईन्यूज

**मणिपूर असंतोषाने धुमसत असून केंद्रीय मंत्र्यांच्या घरावर लोकांनी हल्ला चढविण्यापर्यंत परिस्थिती रसातळाला गेली आहे. दोन महिने ही परिस्थिती असूनही ती आटोक्यात आणण्यात केंद्र सरकारला अपयश आले आहे. काँग्रेसने ईशान्य भारताकडे दुर्लक्ष केल्याची दूषणे देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मणिपूरमधील परिस्थितीबाबत मात्र आता मौन बाळगून आहेत, हे अनाकलनीय असल्याची टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे.**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे चार दिवस मणिपूरमध्ये राहिले होते. तरीही परिस्थिती आटोक्यात आलेली नाही. मणिपूरमधील सध्याचे नेतृत्व निष्प्रभ असेल, तर भाजपने योग्य निर्णय घ्यावा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मणिपूरमधील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केल्यानंतर तरी पंतप्रधानांकडून ठोस कृती होईल, असे वाटले होते. ईशान्येकडील राज्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अटलबिहारी वाजपेयी



यांनी खूप प्रयत्न केले होते; पण सध्या मणिपूरमधील परिस्थितीकडे दुर्लक्ष होत असून वाजपेयी यांचे प्रयत्न वाया जाण्याची भीती आहे.

#### 'एनआरसी' अंमलबजावणीसाठी मणिपूरमध्ये निदर्शने

इंफाळ : राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणीची (एनआरसी) अंमलबजावणी करण्यात यावी आणि राज्यातील संकटावर शांततापूर्ण तोडगा काढण्यात यावा, या मागणीसाठी लोकांनी शनिवारी मणिपूरच्या इंफाळ खोऱ्यात निरनिराळ्या ठिकाणी निदर्शने केली. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या प्रयत्नांना विरोध करण्यासाठी इंफाळ पूर्व जिल्ह्यातील खुराई येथे अनेक महिलांनी धरणे दिले आणि मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांना असलेल्या पाठिंब्याचा पुनरुच्चार केला.

# मंत्रीमंडळ विस्ताराला मुहूर्त?

## » मुख्यमंत्री शिंदे- उपमुख्यमंत्री फडणवीस खलबतं सुरू

।मुंबई। महाईन्यूज

**महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन होऊन एक वर्षाहून अधिकचा कालावधी लोटला आहे. पण शिंदे-फडणवीस सरकारचा अद्याप मंत्रीमंडळ विस्तार झाला नाही. राज्य सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार कधी होणार? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. मंत्रीमंडळ विस्तार होत नसल्याने विरोधकांसह शिंदे गटातील काही नेत्यांनी उघडपणे टीका केली आहे. पण शिंदे-फडणवीस सरकारच्या मंत्रीमंडळ विस्ताराचा अखेर मुहूर्त ठरल्याचं समजत आहे.**



येत्या १० ते १२ दिवसांत शिंदे-फडणवीस सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार होण्याची दाट शक्यता आहे.

याबाबतची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. नवीन मंत्रिमंडळामध्ये शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येकी पाच नेत्यांची मंत्रीपदावर वर्णी लागणार आहे, असंही समजत आहे. त्यामुळे मागील अनेक महिन्यांपासून मंत्रीमंडळ विस्ताराबाबत सुरू असलेल्या तर्क-वितर्कांना तूर्तास पूर्णविराम मिळणार आहे.

खरं तर, मंत्रीमंडळ विस्तार होत नसल्याने शिंदे गटातील अनेक आमदार नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून केला जात होता.

### दिल्लीतील भेटीनंतर हालचाली

दुसरीकडे, शिंदे-फडणवीस सरकारचा केवळ दीड वर्षांचा कार्यकाल बाकी आहे. त्यामुळे नव्याने मंत्रीमंडळ विस्तार केला तर भाजपा व शिंदे गटातील अनेक आमदार नाराज होऊ शकतात, त्यामुळे मंत्रीमंडळ विस्तार केला जात नाही, असंही बोललं जात होतं. पण येत्या १० ते १२ दिवसात शिंदे-फडणवीस सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळत आहे.दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या दिल्लीतील भेटीगाठीही वाढल्या होत्या. शेवटच्या भेटीत मंत्रीमंडळ विस्ताराबाबतचे काही विषय मार्गी लावण्यासाठी शिंदे-फडणवीसांना दिल्लीला बोलावल्याचंही पहायला मिळालं.



# फ्रान्स अजूनही धगधगतंय

## 1300 हून अधिक जणांना अटक; ॲपल, नायकी ब्रँडच्या दुकानांत लुटमार

। वृत्तसंस्था ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काही दिवसांपासून फ्रान्समध्ये हिंसाचार सुरू आहे. १७ वर्षीय अल्पवयीन मुलावर पॅरिसमध्ये पोलिसांनी गोळीबार केला होता. त्यानंतर पोलिस आणि सरकारविरोधात फ्रान्समधील नागरिक आक्रमक झाले आहेत. पाचव्या दिवशीही मार्सेल या शहरात पोलिस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाला.**

नेमकं घडलं काय?




पॅरिसच्या उपनगरात मंगळवारी वाहतूक नियमाचे उल्लंघन केल्याबद्दल पोलिसांनी १७ वर्षीय नाहेल एम. नावाच्या मुलावर गोळीबार केला होता. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात मुलाचा मृत्यू झाला. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर सरकार आणि पोलिसांच्या विरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप उफाळला.

या घटनेच्या निषेधार्थ नागरिक पॅरिस उपनगरात आणि फ्रान्समधील रस्त्यांवर उतरले आहेत. अनेक ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. आंदोलकांकडून गाड्यांची जाळपोळ, इमारती व दुकानांची लुटमार सुरू आहे. पोलिसांनी आंदोलकांना रोखण्यासाठी अश्रुधुराचा वापर केला आहे.

शनिवारी फ्रान्समध्ये सुमारे ४५ हजार पोलिस तैनात करण्यात आले आहेत. गुरुवारी ९०० आंदोलकांना पोलिसांनी अटक केली होती. शुक्रवारी १३०० हून अधिक आंदोलकांना पोलिसांनी अटक केली आहे.पॅरिसमध्ये लुई व्हिटॉनसारख्या ब्रँडची दुकाने आंदोलकांकडून लुटण्यात येत आहेत. 'झारा', 'ॲपल' व 'नायकी'सारख्या ब्रँडच्या दुकानांमध्येही आंदोलकांनी लुटमार केली आहे.

### नागरिकांना आवाहन

फ्रान्समध्ये १७ वर्षीय मुलाची हत्या झाल्यानंतर तीन दिवस दंगली सुरू होत्या यावर फान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी या दंगलीसाठी व्हिडीओ गेम जबाबदार असल्याचे सांगितले आहे. देशात सुरू असलेल्या हिंसेवर चर्चा करण्यासाठी आयोजित एका सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. मॅक्रॉन म्हणाले, " ज्या मुलांना व्हिडीओ गेमचे व्यसन आहे ते प्रत्यक्ष आयुष्यातही रस्त्यावर व्हिडीओ गेममध्ये दाखवल्याप्रमाणे दंगली घडवून आणतात."फ्रान्सचे राष्ट्रध्यक्ष यांनी पालकांना आवाहन केले आहे की त्यांनी मुलांना घरीच सुरक्षित ठेवावे. सध्या देशात शांती प्रस्थापित करणे , ही खूप मोठी जबाबदारी आहे, त्यासाठी मुलांना हिंसेपासून दूर ठेवावे, असेही ते म्हणाले.

---

## समान नागरी कायदा विधेयक पावसाळी अधिवेशनातच मांडलं जाणार?

। नवी दिल्ली ।महाईन्यूज

**सध्या देशभरात समान नागरी कायद्यावरून जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही या कायद्याचं समर्थन करणारी भूमिका जाहीरपणे मांडली असताना विरोधकांनी त्यावरून सरकारला लक्ष्य केलं आहे. समान नागरी कायदा फक्त धर्माच्या बाबतीतच नसून ईडी-सीबीआयच्या कारवायांमध्येही लागू करावा अशी खोचक टिप्पणी ठाकरे गटाचे मुख्य प्रवक्ते संजय राऊत यांनी घेतली आहे. या पार्श्वभूमीवर हे विधेयत नेमकं कधी संसदेत मांडलं जाणार? याची चर्चा चालू असतानाच पावसाळी अधिवेशनातच ते संसदेत येणार असल्याचं सांगितलं जात आहे.**

भारतीय जनता पक्षाकडून समान नागरी कायद्याचं समर्थन केलं जात असून लवकरात लवकर हा कायदा संसदेत मंजूर करून घेण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचं भाजपाकडून सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर देशभरात यावरून प्रतिक्रिया उमटत आहेत. एमआयएम पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी यासंदर्भाच आक्रमक भूमिका घेतली असून कायद्याला विरोध केला आहे. तर दुसरीकडे आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी समान नागरी कायद्याला तत्वत: पाठिंबा दिला आहे.

समान नागरी कायदा विधेयक संसदेच माडण्यात आल्यानंतर संसदीय समितीकडे पाठवलं जाण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. संसदीय समितीमध्ये या विधेयकावर सखोल चर्चा होईल. या समितीकडून विधेयक संसदेकडे आल्यानंतर त्यावर पुन्हा संसदेत चर्चा होऊन त्याला अंतिम स्वरूप दिलं जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, कायदा आयोगानं या कायद्यासंदर्भात समान नागरी कायद्याबाबत संबंधितांच्या प्रतिक्रिया मागवल्या असून त्यावरही आयोगाकडून सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे. जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात संसदेचं पावसाळी अधिवेशन होणार आहे. पहिले काही दिवस जुन्या संसदेत कामकाज होईल. त्यानंतर अधिवेशनाच्या मध्यावर नवीन संसद भवनात कामकाजाला सुरुवात होईल.

---

# केंद्राच्या वटहुकमाविरुद्ध 'आप' सर्वोच्च न्यायालयात

## तातडीने रद्द करण्याची मागणी; निर्णयाकडे लक्ष

। नवी दिल्ली। महाईन्यूज

**दिल्लीतील राज्य सरकारचे प्रशासकीय सेवांवरील नियंत्रण काढून घेणाऱ्या केंद्राच्या वटहुकमाविरोधात शुक्रवारी आम आदमी पक्षाने (आप) सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. केंद्राचा हा वटहुकूम घटनाबाह्य व मनमानी असून त्यावर तातडीने बंदी घालावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.**



गेल्या महिन्यात केंद्र सरकारने दिल्लीतील अ-प्रवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि त्यांच्यावरील शिस्तभंगाच्या कारवाईचे राज्य सरकारचे अधिकार रद्द करून राष्ट्रीय राजधानी सार्वजनिक सेवा प्राधिकरण स्थापन करण्याचा अध्यादेश जारी केला. केंद्राच्या या वटहुकमाला दिल्लीतील अरविद केजरीवाल यांच्या सरकारने कडाडून विरोध केला आहे. ३ जुलैपासून वटहुकमाच्या प्रती जाळून केंद्र सरकारविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय आपने घेतला आहे.

पूर्ण राज्याचा दर्जा नसलेल्या दिल्लीसारख्या राज्यांमध्ये लोकनियुक्त सरकारांकडे प्रशासकीय सेवांचे अधिकार राहतील, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिला होता. त्यामुळे नायब राज्यपालांकडे निर्णयाचे अंतिम अधिकार नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र केंद्र सरकारने वटहुकूम काढून सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अप्रत्यक्षपणे रद्द केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला केंद्र सरकार किंमत देत नसल्याचा आरोप करत केजरीवाल यांनी देशभरातील भाजपेतर विरोधी पक्षांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न चालविला आहे.

# “ओंक्या तू गद्दार आहेस” ... नम्रता संभेरावने असे उत्तर!



‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमामुळे अभिनेता ओंकार भोजनेला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली. हा कार्यक्रम सोडल्यानंतर ओंकार भोजनेवर अनेक प्रेक्षक नाराज झाले होते. अभिनेत्याने ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’नंतर ‘झी मराठी’ वाहिनीवरील ‘फू बाई फू’ कार्यक्रमात एन्ट्री केली होती. मात्र, हा कार्यक्रम फार काळ चालू शकला नाही. यानंतर प्रेक्षकांनी त्याला पुन्हा हास्यजत्रेत येण्याची विनंती केली परंतु, तसे काहीच झाले नाही त्यामुळे ओंकार भोजनेचे अनेक चाहते त्याच्यावर आजही नाराज आहेत.

नम्रता संभेरावने शेअर केलेल्या फोटोवर एका युजरने ओंकार भोजनेला उद्देशून कमेंट केली आहे. यामध्ये युजर म्हणतो, “ओंक्या तू गद्दार आहेस...तू तुझ्या सगळ्या चाहत्यांबरोबर गद्दारी केलीस. आम्ही सगळे तुला खूप मिस करतो. हास्यजत्रा हा शो का सोडलास, निदान निमिशसारखं एखाद्या स्किटसाठी तरी तू यायला हवं. एकदा परत नक्की ये...आम्हाला सर्वांना तुला पुन्हा हास्यजत्रेत पाहून खूप आनंद होईल.”

चाहत्याने केलेली कमेंट पाहून अखेर नम्रता संभेरावला मध्यस्थी करत ओंकार भोजनेची बाजू स्पष्ट करावी लागली. या युजरला उत्तर देत नम्रता म्हणाली, “प्रत्यक्षात असे काहीच नाही, त्याला नव्या गोष्टी शिकायच्या होत्या म्हणून त्याने त्याचा मार्ग निवडला. आम्ही सर्वांनी त्याच्या निर्णयाचा आदर करत त्याला सहकार्य केले.” अभिनेत्रीने मित्राची खंबीरपणे बाजू घेतल्यामुळे नेटकऱ्यांनी नम्रताचे कौतुक करत तिने दिलेल्या उत्तरावर सहमती दर्शवली.

# सलमानने प्रेक्षकांची मागितली माफी

दोन आठवड्यांपूर्वी सुरू झालेला ‘बिग बॉस ओटीटी २’ हा शो चांगलाच चर्चेत आला आहे. पण या पर्वामध्ये घडलेल्या दोन घटनांमुळे प्रेक्षकवर्ग मात्र नाराज झाला आहे. शिवाय सलमान खानलाही स्पर्धकांनी नाराज केल्याचं शनिवारच्या विकेंडच्या वारमध्ये पाहायला मिळालं. दोन घटनांमुळे सलमान खाननं प्रेक्षकांची जाहीर माफी मागितली आहे. जर पुन्हा अशा घटना घडल्या तर शो सोडण्याची भाषाही सलमाननं केली. नेमकं काय घडलं जाणून घ्या.

मागील आठवड्यात आकांक्षा पुरी आणि जैद हदीद दोघेही ३० सेकंद किस करताना दिसले होते. यामुळे बिग बॉस ओटीटी शोला अडल्ट शो म्हटलं गेलं. तसेच टीआरपीसाठी हे सर्व सुरू असल्याचं म्हणत प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केली. ही घटना ताजी असतानाच बिग बॉसच्या घरात आणखी एक घटना घडली. जैद हदीदनं भांडता भांडता बेबिका धुर्वेसमोर आपली पँट काढली. यानंतर संपूर्ण घरात गोंधळ झाला. बेबिकानं गोंधळ घालत घर डोक्यावर घेतलं. “बिग बॉसच्या घरात एकतर मी राहीन नाही तर हा हदीद,” असं म्हणत तिनं बिग बॉसच्या घरातील दारासमोर ड्रामा केला. या दोन घटनेचा चांगलाच समाचार विकेंडच्या वारमध्ये सलमान खानने घेतला. पण या दोन घटनांमुळे प्रेक्षक नाराज झाले आहेत. परिणामी सलमानने सर्वांची जाहीर माफी मागितली.

विकेंडच्या वारच्या सुरुवातीलाच सलमान म्हणाला की, “गेल्या आठवड्यात असं बरंच काही घडलंय, ज्याच्याबाबत तुम्हालाही जाणून घ्यायचं आहे आणि मलाही जाणून घ्यायचं आहे. याबाबत बरेच प्रश्न तुम्हालाही आहेत आणि मलाही पडले आहेत. बऱ्याच लोकांना घरात जे घडलं ते आवडलेलं नाही. पण ज्यांना हे आवडलं, त्याचं आपण काहीच करू शकतं नाही. परंतु मी या शोचा होस्ट आहे. अशा गोष्टी लोक शोमध्ये करतात. माझ्या चित्रपटात, शोमध्ये तुम्ही अशा गोष्टी कधीच पाहिल्या नसतील. त्यामुळे यांनी असं का केलं? पुढं जाऊन हे लोक असं करणार की नाही? हे त्यांच्याकडून जाणून घेऊया. जर अशा गोष्टी हे लोक पुढेही करणार असतील, तर मी हा शो होस्ट करणार नाही.”



# अभिनेता शाहरुख खानच्या ‘जवानची’ बक्कळ कमाई...



‘पठाण’ला मिळालेल्या तुफान प्रतिसादानंतर शाहरुख खानचे चाहते त्याच्या आगामी ‘जवान’ आणि ‘डंकी’ चित्रपटांची आतुरतेने वाट पाहत आहेत. शाहरुखचा बहुचर्चित ‘जवान’ हा चित्रपट यापूर्वी २ जूनला रिलीज होणार होता, परंतु काही कारणास्तव या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. आता हा चित्रपट ७ सप्टेंबरला प्रदर्शित होणार आहे. मात्र प्रदर्शनापूर्वीच या चित्रपटाच्या कमाईला सुरुवात झाली आहे. जवानाने प्रदर्शनाच्या दोन महिन्यांपूर्वी कोट्यावधी रुपयांची कमाई केली आहे. चित्रपटाने त्याचे संगीत अधिकार टी-सीरीजला विकले आहेत. या करारात चित्रपट निर्मात्यांना ३६ कोटी मिळाले आहेत. अनिरुद्ध रविचंदर या चित्रपटाचे संगीतकार आहेत. याआधी त्यांनी अनेक हिट चित्रपटांना संगीत दिले आहे. यामध्ये विक्रम, मास्टर, मेरी आणि इतर अनेक चित्रपटांचा समावेश आहे. ‘ई-टाइम्स’च्या रिपोर्ट्सनुसार जवान’ चित्रपटाचा टीझर ७ जुलै किंवा १५ जुलैला रिलीज होण्याची शक्यता आहे. शाहरुख खान आणि चित्रपटाचा दिग्दर्शक ॲटली चेन्नईत ‘जवान’चा भव्य टीझर लॉन्च करणार आहेत.

# ‘सत्यप्रेम की कथा’च्या कमाईत तिसऱ्या दिवशी मोठी वाढ



कार्तिक आर्यन व कियारा अडवाणी यांचा ‘सत्यप्रेम की कथा’ हा चित्रपट गुरुवारी कियारा अडवाणी व कार्तिक आर्यन यांचा ‘सत्यप्रेम की कथा’ चित्रपट २९ जून रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसवरही चित्रपट चांगली चांगली कमाई करत आहे. शुक्रवारी कमाईत घट झाल्यानंतर शनिवारी चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये वाढ झाली आहे.

रिलीजच्या पहिल्या दिवशी म्हणजेच गुरुवारी चित्रपटाने ९.२५ कोटी रुपयांची कमाई केली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी कमाईत घट झाली, शुक्रवारी चित्रपटाने फक्त ७ कोटी कमावले. पण, शनिवारी मात्र ६८ टक्के वाढीसह चित्रपटाने ११.७५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. याबरोबरच चित्रपटाने एकूण २८ कोटी रुपयांची कमाई केली आहे. शनिवारी कलेक्शनमध्ये झालेली वाढ पाहता रविवारीही चित्रपट दमदार कमाई करेल, अशी शक्यता आहे. कियारा अडवाणी आणि कार्तिक आर्यन ही जोडी ‘भूल भुलैया २’ नंतर ‘सत्यप्रेम की कथा’मधून पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परतली आहे.

# फुटबॉलचा जादुगार सुनील छेत्री निवृत्त होणार?

## खेळ सोडण्याची कोणतीही अंतिम मुदत निश्चित केलेली नाही : छेत्रीचे स्पष्टीकरण

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्री हा जगातील सर्वोत्तम स्ट्रायकर आहे. त्याने आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ९२ गोल केले आहेत. टीम इंडियाला चॅम्पियन बनवण्यासाठी तो सॅफ चॅम्पियनशिपमध्ये खेळत आहे. भारतीय संघ उपांत्य फेरीत पोहोचला असून आता त्याला लेबनॉनविरुद्ध खेळायचे आहे. टीम इंडियाने नुकताच लेबनॉनला हरवून इंटरकॉन्टिनेंटल कप जिंकला. सुनील छेत्रीने उपांत्य फेरीपूर्वी निवृत्तीबद्दल सांगितले.**



सुनील छेत्रीने शुक्रवारी (३० जून) आपल्या निवृत्तीबद्दलच्या चर्चांना स्पष्टपणे फेटाळून लावले आहे. त्याने सांगितले की खेळ सोडण्याची कोणतीही अंतिम मुदत निश्चित केलेली नाही. छेत्री ३८ वर्षांचा आहे परंतु तरीही तो भारतीय आक्रमणाचा प्रमुख आहे. सध्या सुरू असलेल्या सॅफ चॅम्पियनशिपमध्ये त्याने तीन सामन्यांमध्ये केलेले पाच गोल हा त्याचा पुरावा आहे.

काय म्हणाला सुनील छेत्री?

सुनील छेत्री म्हणाला, "देशासाठी माझा शेवटचा सामना कधी असेल हे मला माहीत नाही. मी कधीही एवढा पुढचा विचार करत नाही. माझे धोरण हे दीर्घकालीन स्वरूपाचे नसते. माझ्या आयुष्यात फुटबॉल खेळणे हे एकमेव ध्येय ठेवलेले आहे. मी पुढच्या सामन्याचा आणि येणाऱ्या १० दिवसांचा विचार करतो. निवृत्ती एक दिवस होईल आणि तोपर्यंत मी याचा कधीच विचार करणार नाही आणि करत नाही. दुःखाची गोष्ट म्हणजे सेवानिवृत्ती एका वर्षात आहे की सहा महिन्यांत आहे हे मात्र मी सांगू शकत नाही." भारतीय फुटबॉलचा जादुगार सुनील छेत्री पुढे म्हणाला, "सुदैवाने किंवा दुर्दैवाने माझे कुटुंबीयही याचा अंदाज घेत आहेत. जेव्हा ते या गोष्टीचा उल्लेख करतात तेव्हा मी गंमतीने त्यांना माझे आकडे सांगतो."

लेबनॉनसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध भारताचे छेत्रीवरील अवलंबित्व घातक ठरू शकते. बचावात्मक फळीतून आपला मजबूत खेळ सुरू ठेवण्याची आशा संघाला असेल. संघाने गेल्या नऊ सामन्यांमध्ये फक्त एक गोल स्वीकारला आहे आणि तोही कुवेतविरुद्धचा एक गोल होता.

### सुनील छेत्री उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे

सुनील छेत्री तीन सामन्यांत पाच गोलांसह स्पर्धेच्या गुणतालिकेत आघाडीवर असल्याने तो उत्कृष्ट संपर्कात आहे. यामध्ये पाकिस्तानविरुद्धच्या गोलच्या हॅट्ट्रिकचाही समावेश आहे. कुवेतविरुद्धच्या शेवटच्या साखळी सामन्यात छेत्रीने शानदार गोल करून आपण अजूनही आपल्या खेळात अव्वल असल्याचे सिद्ध केले. लेबनॉनविरुद्धच्या आव्हानावर मात करण्यासाठी छेत्रीला पुन्हा एकदा आपले कौशल्य दाखवावे लागेल. सहल अब्दुल समद, महेश सिंग आणि उदांता सिंग या खेळाडूंना त्यांच्या कर्णधाराला पाठिंबा देण्यासाठी पुढे यावे लागेल. या सर्वांनी स्पर्धेत आपली भूमिका चांगली बजावली पण छेत्री व्यतिरिक्त फक्त उदांता आणि महेश संघासाठी गोल करू शकले.

# महाविक्रम! स्टीव्ह स्मिथने कसोटीत राहुल द्रविड यांचा मोठा रेकॉर्ड मोडला

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय संघ काही दिवसांत वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यावर जाण्यापूर्वी बीसीसीआयने एक मोठी घोषणा केली आहे.बीसीसीआयने जाहीर केले की, ड्रीम इलेव्हन पुढील तीन वर्षांसाठी भारतीय संघाचा मुख्य प्रायोजक असेल. वेस्ट इंडिज दौऱ्यावर होणाऱ्या कसोटी मालिकेतून भारतीय संघाच्या जर्सीवर ड्रीम इलेव्हनचे नाव दिसणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ सायकलमधील टीम इंडियाचा हा पहिला सामना असेल. ड्रीम इलेव्हन बायजूसची जागा घेईल**



बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी म्हणाले, "मी ड्रीम इलेव्हनचे अभिनंदन करतो आणि बोर्डात त्यांचे पुन्हा स्वागत करतो. बीसीसीआयचा अधिकृत प्रायोजक असण्यापासून ते आता मुख्य प्रायोजक होण्यापर्यंत, बीसीसीआय आणि ड्रीम इलेव्हनची भागीदारी मजबूत होत आहे. भारतीय क्रिकेटचा विश्वास, मूल्य, क्षमता आणि वाढीचा हा एक पुरावा आहे. आम्ही या वर्षाच्या अखेरीस आयसीसी विश्वचषक आयोजित करण्याची तयारी करत असताना, दर्शकांचा अनुभव वाढवणे हे आमच्या सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक आहे. मला खात्री आहे की, ही भागीदारी आम्हाला चाहत्यांच्या सहभागाचा अनुभव वाढविण्यात मदत करेल."

वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया – रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, ऋतुराज गायकवाड, विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, अजिंक्य रहाणे (उपकर्णधार), केएस भरत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), आर अश्विन, रवींद्र जडेजा, शार्दुल ठाकूर, अक्षर पटेल, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, जयदेव उनाडकट आणि नवदीप सैनी.

### ...ही तर अभिमानाची बाब : हर्ष जैन

या भागीदारीबद्दल भाष्य करताना, ड्रीम स्पोर्ट्सचे सह-संस्थापक आणि सीईओ हर्ष जैन म्हणाले, "बीसीसीआय आणि टीम इंडियाचे दीर्घकाळ भागीदार म्हणून, ड्रीम इलेव्हन आमची भागीदारी पुढील स्तरावर नेण्यासाठी रोमांचित आहे. ड्रीम इलेव्हनमध्ये, आम्ही एक अब्ज भारतीय क्रिकेट चाहत्यांसोबत आमचे क्रिकेट प्रेम शेअर करतो आणि राष्ट्रीय संघासाठी मुख्य प्रायोजक असणे ही अभिमानाची आणि सौभाग्याची बाब आहे. आम्ही भारतीय क्रीडा इकोसिस्टमला सतत पाठिंबा देण्यासाठी उत्सुक आहोत." विशेष म्हणजे अलीकडेच टीम इंडियाचा किट प्रायोजकही बदलला आहे. आदिदासने भारतीय क्रिकेट संघाचा नवीन किट प्रायोजक बनला आहे. आदिदासने 'किलर'ची जागा घेतली आहे.

# आयसीसी वनडे वर्ल्डकपचे बिगुल वाजले



। बेंगळुरू ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतात ११ वर्षांनंतर पुन्हा एकदा आयसीसी वनडे वर्ल्डकप होत आहे. याआधी २०११ साली झालेल्या स्पर्धेत भारताने विजेतेपद मिळवले होते. आता रोहित आणि कंपनी विजेतेपदासाठी मैदानात उतरेल. आयसीसीने काही दिवसांपूर्वी या स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर केले.**

भारताची पहिली लढत ८ ऑक्टोबर रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. साखळी फेरीत भारत ९ मॅच खेळणार आहे. या लढती ज्या मैदानावर होणार आहेत तेथे टीम इंडियाचे रेकॉर्ड कसे आहे ते जाणून घेऊयात.

भारतातील सर्वात जुन्या मैदानांपैकी एक एम चिदंबरम स्टेडियम आहे. याला चेपॉक असे देखील म्हटले जाते. या मैदानावर आतापर्यंत २२ वनडे झाल्या आहेत. भारताने येथे १४ लढती खेळल्या असून त्यापैकी ७ मध्ये विजय मिळवला आहे. वर्ल्डकपमध्ये भारताची पहिली लढत याच मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होईल. भारताने १९८२ पासून दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियम (फिरोज शाह कोटला) मैदानावर १३ सामने जिंकले आहेत. वर्ल्डकपमध्ये या मैदानावर भारताची लढत अफगाणिस्तानविरुद्ध होणार आहे.

१) एम चिदंबरम स्टेडियम (चेन्नई)
२) अरुण जेटली स्टेडियम (दिल्ली)
३) नरेंद्र मोदी स्टेडियम (अहमदाबाद)
४) MCA स्टेडियम (पुणे)
५) HPCA स्टेडियम (धर्मशाला) : ६) अटल बिहारी वाजपेयी स्टेडियम (लखनौ)
७) वानखेडे स्टेडियम (मुंबई)
८) इडन गार्डन्स (कोलकाता)
९) चिन्नास्वामी स्टेडियम (बेंगळुरू)

या स्टेडिअमवर भारतीय संघ कामगिरी दाखवणार आहे.